शहापूर येथील सिव्हील जज्ज (क.स्त.) यांचे कोर्टात,
शहापूर

रे.द.नं. 03/2004

मोरेश्वर देशमुख ... दरखास्तदार

वि

दत्तात्रय देशमुख ... सामनेवाले/प्रतिवादी

नि. 165




O
In the Interest of justice application is allowed
11/6/2024

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शहापूर

अर्ज सि.प्रो.कोडचे कलम 152 प्रमाणे नि. 156 वर आदेश करताना दाव्याचा नंबर लिहिताना झालेली टंकलेखनाची चुक दुरुस्तीसाठी

वादी दरखास्तदार मा. कोर्टास लिहितात ते येणेप्रमाणे

O
Ord. Today say
07/05

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शहापूर

O
Say not filed hence application in order to proceed without say
11/6/24

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शहापूर

सदरहु कामी वादी-दरखास्तदार यांनी नि. 156 कडे सिप्रो कोडचे ऑर्डर 21 रुल 3[illegible] प्रमाणे अवैध बांधकाम काढुन जाण्यायेण्याचा रस्ता मोकळा करण्यासाठी अर्ज केला होता व आहे.

सदरचे अर्जकामी मा. कोर्टाने दिनांक 11/1/1[illegible] रोजी त्यावेळचे कोर्टाने तसा आदेश केलेला आहे. सदरहु आदेश करताना आदेशातील पान क्र. 3, व 4 मध्ये दोन ठिकाणी दाव्याचा नंबर लिहिताना 35/18 ऐवजी 38/18 असे टंकलेखनात केले गेलेले आहे.

मागे पहा

वरीलप्रमाणे नि. १५६ मध्ये दाव्याचा नंबर लिहीताना "३५" ऐवजी "३८" असे चुकीने टंकलेखीत झालेले आहे. सदरची चुक झाल्याकडे वॉरंटची बजावणी होण्यास अडचण निर्माण झाली आहे

यावरुन वादी दरखास्तदार यांची विनंती की, सदरहू दरखास्तकामी नि १५६ वरील आदेशामध्ये परिच्छेद ३, ५ व ६ मध्ये झालेली टंकलेखनाची चुक म्हणजेच दाव्याचा नंबर लिहीताना ३५ ऐवजी चुकीने ३८ असे टंकलेखीत झाले आहे ती चुक दुरुस्त करुन रे.मु ३५/१८ असे लिहीण्यात यावे व झालेली चुक दुरुस्त करण्याबाबत योग्य ते आदेश व्हावेत.

शाहपूर
दि ०१/५/२४

वादी दरखास्तदार

वादी दरखास्तदारांचे वकील

15 ... cution

<u>नियमित दरखास्त कमांक ३/२००५ मोरेश्वर-वि.-दत्तात्रय व इ.</u>

<u>मध्ये निशाणी १५६ वरील आदेश</u>

<u>C.N.R. No. : MHTH20-000154-2005</u>

१. सदरची दरखास्त डी.एच. यांनी अतिक्रमीत टपरीचे बांधकाम, पडवीचे बांधकाम, झोपडे, तारेचे कंपाऊंड, रस्त्यावर रचलेल्या दगडी जे.डी. यांनी काढुन घेणेकरिता दाखल केली आहे.

२. डी.एच. यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी जे.डी. क्र. ०१ व ०२ यांचे विरुध्द रे.मु. क्र. <u>३५/९८</u> दाखल केला होता. सदर दाव्याच्या हुकुमनाम्याप्रमाणे जे.डी. क्र. ०१ व ०२ यांनी डी.एच. यांच्या राईस मिलला अडथळा निर्माण करु नये. तसेच रस्त्यावर अतिक्रमण करु नये असा मनाई हुकुम जे.डी. क्र. ०१ व ०२ यांचेविरुध्द देण्यात आला.

Corrected as per order below Exh-165. 11/6/18

३५/९८

३. डी.एच. यांनी सदर रे.मु. क्र. <u>३८/९८</u> च्या हुकुमनाम्याप्रमाणे रे.द.क्र. <u>२/२००२</u> दाखल केली. सदर दरखास्तमध्ये दि. १२/०४/२००१ रोजी डी.एच. व जे.डी. क्र. ०१ व ०२ यांचेत आपसात तडजोड झाली व त्याप्रमाणे डी.एच. यांनी राईस मिल कडे जाणाऱ्या रस्त्यावरील अडथळ्याची जे.डी. यांची टपरी स्वतः काढुन घेवुन रस्त्यातील अडथळा दुर केला. तसेच डी.एच. यांचे राईस मिलकडे जाणाऱ्या दक्षिणोत्तर रस्त्यावरील अडथळे दुर केले व पुढे डी.एच. यांचे राईस मिलकडे जाणाऱ्या पुर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर रस्त्यावर जे.डी. कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करणार नाही, अशी हमी दिली.

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर शहापूर

४. त्यानंतर जे.डी. क्र. ०१ याने डी.एच. यांचे राईस मिलकडे

11/6/18

जाणाऱ्या रस्त्यावर ०६ फुट X ७ फुट मातीच्या भिंतीची सिमेंट पत्र्याची टपरी बांधली व टपरीला लागुन पडवीचे बांधकाम बेकायदेशीरपणे वाढविले व रस्त्यावर दगडी रचुन रस्ता अडविला आहे. तसेच दक्षिणोत्तर रस्त्यावर बेकायदेशीरपणे १५ फुट X २० फुटचे कारवीचे कुडाचे झोपडे तयार केले व त्याचे भोवती काटेरी व तारेचे कंपाऊंड तयार करुन रस्ता बंद केला. म्हणुन जे.डी. यांनी न्यायालयाचे मनाई हुकुमाचा भंग केला.

५. डी.एच. यांचे पुढे असे म्हणणे आहे की, जे.डी. हे कोणतेही समाधानकारक कारण नसताना सदरची दरखास्त लांबणीवर टाकत आहेत. तसेच दि. १५.०९.२०१६ पासुन जे.डी. न्यायालयात दरखास्तीचे काम चालविण्यास हजर नाहीत. म्हणुन जे.डी. यांचे विरुध्द रे.मु.क्र. ३८/९८ च्या हुकुमनाम्याप्रमाणे रस्त्यातील अडथळा दुर करण्याकरिता एक्झीक्युशन वॉरंट काढणेकरिता सदरचा निशाणी १५६ वरील अर्ज दाखल केला.

६. सदर अर्जावर जे.डी. यांचे म्हणणे मागविले परंतु अद्यापपावेतो जे. डी. यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. तसेच सदर दरखास्तीचे अवलोकन केले असता, असे दिसुन येते की, जे.डी. हे बऱ्याच तारखांपासुन न्यायालयात हजर नाहीत. तसेच सदर दरखास्तीतील निशाणी क्र. ५७ वरील नकाशाचे अवलोकन केले असता, जे.डी. क्र. ०१ व ०२ यांनी डी.एच. यांच्या राईस मिलजवळील पुर्व-पश्चिम तसेच दक्षिण-उत्तर रस्त्यावर मातीच्या भिंतीची सिमेंट पत्र्याची टपरी बांधली व टपरीला लागुन पडवीचे बांधकाम वाढविले व रस्त्यावर दगडी रचुन रस्ता अडविला असल्याचे तसेच दक्षिणोत्तर रस्त्यावर कारवीचे कुडाचे

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शहापूर

झोपडे तयार करुन त्याचे भोवती काटेरी व तारेचे कंपाऊंड तयार केल्याचे दिसुन येते. जे.डी. यांचेविरुध्द रे.मु. क्र. ३८/९८ मधील हुकुमनाम्याप्रमाणे डी.एच. यांचे राईस मिलवरील रस्त्यावर अतिक्रमण व अडथळा निर्माण करु नये असा मनाई हुकुम असताना जे.डी. यांनी रे.द.क्र. २/२००२ मध्ये तडजोड करुन सदर अडथळा व अतिक्रमण दुर केले. परंतु त्यानंतरही जे.डी. यांनी सदर राईसमिलजवळील दक्षिण-उत्तर व पुर्व-पश्चिम रस्त्यावर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे जे.डी. यांनी रे.मु.क्र. ३८/९८ च्या हुकुमनाम्याचा भंग केला आहे. म्हणुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शहापूर

**-: आ दे श :-**

१. अर्ज निशाणी क्रमांक १५६ मंजूर करण्यात येतो.

२. वादातील जागेसंबंधी जे.डी. यांचे विरुध्द एक्झीक्युशन वॉरंट प्रोसेस फी भरल्यानंतर काढण्यात यावे व वादग्रस्त अतिक्रमीत जागेवरील अवैध्य बांधकाम पाडण्यात यावे.

३. बेलिफ भत्ता भरुन नियमांची पुर्तता केल्यानंतर अतिक्रमीत बांधकाम काढुन रस्ता पुर्ववत मोकळा करण्याकरीता बेलिफ नियुक्त करण्यात यावा.

**दिनांक: ११.०६.२०१८**

**(श्रीमती एस. व्ही. मोरे)**
**सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर**
**शहापुर, जि. ठाणे**